पोलीस ठाणे कदिम जालना.

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** जालना **P.S.(ठाणे):** कदीम -जालना

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0132 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 11/04/2024 03:08

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार
**Time Period (कालावधी):** पहर 7
**Date From (दिनांक पासून):** 10/04/2024
**Date To ( दिनांक पर्यंत):** 10/04/2024
**Time From (वेळेपासून):** 20:58 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 20:58 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 11/04/2024 **Time (वेळ):** 02:45 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 004

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 11/04/2024 02:55 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** जालना शहरातील,गांधी चमन जवळील ग्लोबस मेडीकल

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

10 Tot

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** मांदुर खान फजल रहेमान खान पठाण

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1958

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | राएसबी शाळे समोर,टाऊन हल, कचेरी रोड जालना,कदीम -जालना,जालना, महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | राएसबी शाळे समोर,टाऊन हल, कचेरी रोड जालना,कदीम -जालना,जालना, महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9423274956

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | उत्तम शंकरराव लाडाने | | | 1. राइन्कमटक्स कलनी जालना , कदीम -जालना,जालना,महाराष्ट्र, भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | लाचेची रक्कम न्थ्रासिन पावडर लागलेली | 30,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

30,000.00

**11. Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक 11.04.2024.

मी मांदुर खान फजल रहेमान खान पठाण वय 66 वर्ष व्यवसाय- शेती रा.एस.बी. शाळे समोर, टाऊन हॉल, कचेरी रोड जालना मो.क्र.9423274956.

समक्ष ॲन्टी करप्शन ब्युरो जालना येथे हजर राहुन फिर्याद देतो की, मी दिनांक 10.04.2024 रोजी ॲन्टी करप्शन ब्युरो जालना येथे हजर राहुन तक्रार दिली होती की, मी वरील ठिकाणचा राहणारा असुन शेती करुन कुटुंबाचा उदरनिर्वाह करतो. मी दिनांक 01.10.2009 रोजी दस्त क्रमांक 3954/2009 अन्वये जालना महानगर पालिका हद्यीतील नगर भुमापन क्रमांक 9098 प्लॉट खरेदी केलेला असुन त्यावर मी सन 2015 मध्ये बांधकाम केलेले आहे.

दिनांक 18.01.2024 रोजी मला महानगर पालिका जालना यांचे कडुन दिनांक 01.04.2018 ते दिनांक 31.03.2024 रोजी पावेतोचा 1,24,596/-रुपये मालमत्ता कर भरण्यासाठी मागणी बिल देण्यात आले. त्यावर मी महानगर पालिका जालना यांचा मालमत्ता कर न भरल्याने दिनांक 12.02.2024 रोजी महानगर पालिका जालना यांनी वसुली लिपिक लाडाने यांनी मला मालमत्ता जप्तीची नोटीस दिली.

त्यावर मी दिनांक 05.04.2024 रोजी माझ्या कडे बाकी असलेला 1,24,596/-रुपये मालमत्ता करा पैकी 41532/-रुपये कर भरण्यासाठी युनियन बॅकेचा चेक महानगर पालिका जालना येथील वसुली लिपिक लाडाने यांना ग्लोबस मेडीकलवर दिला. त्यावेळी वसुली लिपिक लाडाने यांनी मला सांगितले की, तुमच्या कडे बाकी राहिलेला 83,063/-रुपये मालमत्ता कर निल दाखवतो, त्यासाठी मला 40,000/-रुपये दया असे सांगितले. त्याचवेळी त्यांनी माझ्या कडील रोख 10,000/-रुपये घेऊन बाकी राहिलेले 30,000/-रुपये दिनांक 10.04.2024 रोजी दया असे म्हणुन निघुन गेले.

महानगर पालिका जालना येथील वसुली लिपिक लाडाने यांनी मागीतलेले पैसे हे लाचेचे आहे हे मला माहिती असल्याने मी आज रोजी ॲन्टी करप्शन ब्युरो जालना येथे तक्रार देण्यासाठी हजर आलो आहे. मला महानगर पालिका जालना येथील वसुली लिपिक लाडाने यांना पैसे देण्याची इच्छा नाही. त्यांची व माझी वैयक्तिक दुश्मनी नाही किंवा त्यांचा माझा देण्या घेण्याचा कोणताही आर्थिक व्यवहार नाही. मी जर त्यांना पैसे दिले नाही तर ते माझे काम करणार नाही.

आज दिनांक 10.04.2024 रोजी महानगर पालिका जालना येथील वसुली लिपिक लाडाने यांची भेट घेणार आहे. त्यावेळी त्यांनी मला लाचेची मागणी करुन स्वत: किंवा इतरां मार्फत स्विकारल्यास कायदेशीर कारवाई करावी ही विनंती अशा मजकुराची तक्रार दिली होती. माझ्या दिलेल्या तक्रारी वरुन ॲन्टी करप्शन ब्युरो जालना येथील पोलीस उप अधीक्षक श्री.किरण बिडवे साहेब यांनी दोन शासकिय पंचाना बोलावुन माझी व पंचाची ओळख करुन देवुन माझी तक्रार त्यांना दाखविली. सदर लेखी तक्रारीवर मी, दोन्ही पंचांनी व श्री.बिडवे साहेबांनी सह्या केल्या आहे.

मी महानगर पालिका जालना येथील वसुली लिपिक लाडाने यांचे विरुध्द दिलेली तक्रार खरी आहे काय ? ते माझ्या कडे लाच मागतात काय ? याची खात्री करण्यासाठी श्री.बिडवे साहेब यांनी मला, पंचाना व सापळा पथकास सूचना देवुन पोलीस अंमलदार घायवट यांनी व्हाईस रेकॉर्डर मशीन मध्ये एक नविन मेमरी कार्ड टाकुन त्यामध्ये पूर्वीचे कोणतेही संभाषण नसल्याची खात्री करुन दिली. त्यानंतर मी माझ्या मोबाईल वरुन वसुली लिपिक लाडाने यांना कॉल केला असता त्यांनी मला जूना जालन्यातील रेल्वे फाटक जवळ उडडान पूलाचे खाली भेटण्यास बोलाविले.

त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर मशीन सुरु करुन त्यामध्ये माझे, दोन्ही पंचाचे व श्री.बिडवे साहेबांचे वक्तव्य घेऊन व्हाईस रेकॉर्डर एका कापडी पिशवीत टाकुन माझ्या शर्टाच्या आतुन गळयात अडकवुन दिली. त्यानंतर मी व पंच क्र.1 श्री. मस्के असे आम्ही दोघे माझ्या जवळील मोटार सायकलने जूना जालन्यातील रेल्वे फाटक जवळ उडडान पूलाचे

खाली जावून वसुली लिपिक लाडाने यांना भेटण्यासाठी थांबलो. त्यानंतर काही वेळातच वसुली लिपिक लाडाने हे त्यांचे जवळील मोटार सायकलने त्याठिकाणी आले.त्यावेळी पंच क्र. 01 श्री.मस्के यांचे समक्ष महानगर पालिका येथील वसुली लिपिक लाडाने व माझी कामा संबंधी चर्चा झाली. आमच्या चर्चे दरम्यान मी लाडाने म्हणालो की, चालीस हजार बच रहेते, दस हजार तुमको दे दिया असे म्हणालो.त्यावर लाडाने हो दिले हा बस उसका असे म्हणाले. त्यानंतर थोडया वेळाने मी लाडाने यांना म्हणालो की, और दस देता मे एैसा बोल रहा था असे म्हणालो. त्यावर लाडाने तीस हजार दे दे, तीस दे तीस दे असे म्हणाले. त्यानंतर पुन्हा आमच्यात कामा संबंधी बरीच चर्चा झाली. त्यानंतर थोडया वेळाने लाडाने पाच बजे तक होगा ना, मेडीकल पे आजाना असे म्हणाले असता मी त्यांना मेडीकल पे आजाना असे म्हणालो. त्यानंतर पुन्हा आमच्यात कामा संबंधी बरीच चर्चा झाली.त्यानंतर मी व पंच क्र.1 मस्के असे आम्ही दोघे ॲन्टी करप्शन ब्युरो जालना कार्यालयात परत आलो. तेव्हा माझे जवळील व्हाईस रेकॉर्डर पोलीस अंमलदार घायवट यांनी बंद केला. त्यानंतर बिडवे साहेबांनी व्हाईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड झालेले महत्वाचे संभाषण ऐकले. त्यामध्ये महानगर पालिका येथील वसुली लिपिक लाडाने यांनी तक्रारदार यांच्या कडे बाकी राहिलेला 83,063/-रुपये मालमत्ता कर निल दाखवण्यासाठी 30,000/-रुपये लाचेची मागणी करुन ग्लोबस मेडीकल वर स्वत: स्विकारणार असल्याचे निष्पन्न झाले.

त्यावरुन दिनांक 10.04.2024 रोजी श्री.बिडवे साहेब यांनी महानगर पालिका येथील वसुली लिपिक लाडाने यांचे विरुध्द माझ्या मालकीच्या ग्लोबस मेडीकल दुकानामध्ये सापळा लावण्याचे ठरविले. त्यावरुन श्री.बिडवे साहेब यांचे सूचने वरुन ॲन्टी करप्शन ब्युरो जालना येथे पोलीस उपअधीक्षक यांच्या कक्षात पोलीस अंमलदार जुंबड यांनी अंथ्रासीन पावडरची व अल्ट्राव्हायलेट लाईटच्या गुणधर्माची माहीती देवुन मला व दोन्ही पंचांना त्याचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. वसुली लिपिक लाडाने यांना लाच म्हणुन देण्यासाठी माझ्या कडील पाचशे रुपये दराच्या 30 नोटा एकुण 30,000/- रुपये रक्कमेला ॲन्थ्रासिन पावडर लावून नोटा माझ्या पॅन्टचे समोरील उजव्या खिशात ठेवल्या. त्यानंतर बिडवे साहेबांनी मला व पंच श्री.मस्के यांना सविस्तर सूचना दिल्या. त्यामध्ये मला सुचना दिली की, वसुली लिपिक लाडाने यांनी लाचेची रक्कम स्विकारल्या नंतर डोक्यातील टोपी डाव्या हाताने काढून लाचेची रक्कम स्विकारल्याचा इशारा करावा अशी सुचना दिली. त्यानंतर श्री.बिडवे साहेबांचे सांगणे वरुन पोलीस अंमलदार श्री.घायवट यांनी व्हाईस रेकॉर्डर मशीन सुरु करुन एका कापडी पिशवीत टाकुन माझ्या शर्टाच्या आतुन गळ्यात अडकवुन देवून माझ्या सोबत पंच श्री.मस्के असे आम्हा दोघांना माझ्या मालकीच्या ग्लोबस मेडीकल दूकानात थांबण्यासाठी ॲन्टी करप्शन ब्युरो कार्यालय जालना येथून रवाना केले. त्यानंतर मी व पंच श्री.मस्के असे आम्ही दोघेजण माझ्या जवळील मोटार सायकलने ॲन्टी करप्शन ब्युरो कार्यालय जालना येथून माझ्या ग्लोबस मेडीकल जवळ गेलो. त्याठिकाणी मी मेडीकलच्या आतमध्ये जावून थांबलो व पंच श्री.मस्के हे माझ्या दूकानाच्या काऊंटरवर बाहेरील बाजूस माझ्या जवळच थांबले. माझ्या पाठीमागे सापळा पथक व पंच क्र.2 श्री.गोजे असे बिडवे साहेबांचे खाजगी वाहनात बसुन व सापळा पथक हे त्यांचे जवळील मोटार सायकलने त्याठिकाणी आले व माझ्या ग्लोबस मेडीकल दूकानाचे आजुबाजूला सापळा लावून थांबले.

त्यानंतर काही वेळाने वसुली लिपिक लाडाने हे माझ्या दूकानात आले व आतमध्ये माझ्या समोरील असलेल्या खुर्चीवर येवून बसले. त्यावेळी पंच क्र. 01 मस्के यांचे समक्ष माझे व वसुली लिपिक लाडाने यांचेत कामा संबंधाने चर्चा झाली. आमच्या चर्चे दरम्यान मी त्यांना म्हणालो की, इसमे कम नही करा असे म्हणालो. त्यावर लाडाने हा किती किती दे तीस हे ओ असे म्हणाले. त्यावेळी आमचे बोलणे चालु असतांना पंच क्र.1 मस्के यांचे समक्ष मी माझ्या अंगातील पॅन्टच्या उजव्या बाजुच्या खिशात ठेवलेली ॲन्थ्रासिन पावडर लावलेली लाचेची रक्कम 30,000 रुपये माझ्या उजव्या हाताने बाहेर काढून तीस हजार हे असे म्हणुन वसुली लिपिक लाडाने यांचे समोर धरली असता त्यांनी त्यांच्या उजव्या हाताने ॲन्थ्रासिन पावडर लावलेली लाचेची 30,000 रुपये रक्कम स्विकारुन दोन्ही हातांनी तिन वेळेस मोजली व म्हणाले की, त्यात एक नोट कमी आहे, त्यावेळी मी त्यांना त्यामध्ये पुर्ण 30,000 रुपये आहेत असे सांगीतले.त्यानंतर त्यांनी सदरील रक्कम ही त्यांच्या अंगातील शर्टच्या डाव्या बाजूच्या खिशात ठेवली.त्यानंतर मी ठरल्या प्रमाणे माझ्या डाव्या हाताने माझ्या डोक्यातील टोपी काढून लाचेची रक्कम स्विकारल्याचा इशारा सापळा पथकास दिला असता सापळा पथक हे पंच क्र. 02 श्री. गोजे यांचेसह बिडवे साहेबां सोबत तेथे दाखल झाले. त्यावेळी पोलीस अंमलदार गजानन घायवट यांनी माझ्या जवळील व्हाईस रेकॉर्डर मशीन ताब्यात घेऊन बंद केली.

त्यानंतर श्री.बिडवे साहेबांनी पंच क्र.1 मस्के यांना लाचेची रक्कम कोणी मागितली व कोणी स्विकारली असे विचारले असता पंच क्र.1 मस्के यांनी तेथे हजर असलेल्या एका इसमाकडे अगुली निर्देश करुन हेच ते वसुली लिपिक लाडाने असुन यांनी आत्ताच माझ्या समक्ष तक्रारदार श्री.पठाण यांच्या कडुन उजव्या हाताने लाचेची रक्कम स्विकारुन दोन्ही हाताने मोजुन त्यांच्या अंगातील शर्टच्या डाव्या बाजूच्या खिशात ठेवली आहे असे सांगीतल्याने

सापळा पथकाने वसुली लिपिक लाडाने यांचे दोन्ही हात मनगटाजवळ घटट धरले.त्यानंतर पोलीस उपअधीक्षक श्री. बिडवे साहेब यांनी त्यांची, पंचाची व सापळा पथकाची ओळख करुन दिली. त्यानंतर कर वसुलदार श्री.लाडाने यांना त्यांचे नाव गाव पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव उत्तम शंकरराव लाडाने वय 53 वर्ष व्यवसाय नोकरी पूरूष मजूर सफाई कामगार अतिरिक्त पदभार वसुली लिपिक कर विभाग महानगर पालिका जालना रा.इन्कमटॅक्स कॉलनी जालना असे सांगीतले.

त्यानंतर श्री.बिडवे साहेब यांचे सूचने वरुन पंच क्र.2 श्री.गोजे यांनी उत्तम लाडाने यांच्या अंगातील शर्टच्या डाव्या बाजूच्या खिश्यातुन ॲन्थ्रासिन पावडर लावलेले 30,000/- रुपये लाचेची रक्कम काढुन घेवुन सदर नोटांचे क्रमांक व सापळापुर्व पंचनाम्यातील नोटांचे क्रमांक एकच असल्याची खात्री केली. त्यानंतर त्याठिकाणी मेडीकल दुकानात गिऱ्हाईक येत असल्याने बिडवे साहेब व सापळा पथक हे वसुली लिपिक लाडाने यांना घेवून मेडीकल दूकानात असलेली पाठीमागील रुम मध्ये घेवून गेले व मला रुमच्या बाहेर थांबण्यास सांगीतले. त्यानंतर रुममध्ये काळ्या कपडयाच्या सहायाने अंधार करुन पोलीस उपअधीक्षक श्री.बिडवे साहेब यांनी अल्ट्राव्हायलेट लाईटच्या सहायाने वसुली लिपिक लाडाने याचे दोन्ही हात, अंगातील शर्टचा डावा खिसा व लाचेच्या नोटा चेक केल्या असता वसुली लिपिक लाडाने यांचे दोन्ही हाताचे बोटावर, शर्टच्या डाव्या खिश्याच्या तोंडावर व आतमध्ये तसेच लाचेच्या नोटावर ठिक ठिकाणी हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली. त्यानंतर सदर 30,000/-रुपये लाचेची रक्कम पंचा समक्ष जागीच लाख सिल मोहर करुन जप्त करण्यात आली. तसेच माझे हात व अंगावरील कपडे अल्ट्राव्हायलेट लाईटच्या सहायाने चेक केले असता माझे उजव्या हाताचे बोटावर व अंगातील पॅन्टच्या समोरील उजव्या बाजुच्या खिश्याच्या तोंडावर व आतमध्ये ठिक ठिकाणी हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली. त्यानंतर सापळा पथकाने वसुली लिपिक लाडाने यांना ताब्यात घेऊन ॲन्टी करप्शन ब्युरो जालना कार्यालयात आलो. ॲन्टी करप्शन ब्युरो कार्यालयात उत्तम लाडाने यांचे अंगातील शर्ट लाख सिल मोहर करुन जप्त करण्यात आले. त्याबाबतचा सापळा पथकाने सविस्तर पंचनामा केला.तरी वसुली लिपिक उत्तम लाडाने यांचे विरुध्द योग्य ती कायदेशीर कारवाई करावी.
मी दिलेली फिर्याद माझे सांगणे प्रमाणे संगणकावर टंकलीखीत केली असुन त्याची प्रिंट काढुन मी वाचुन पाहिली. ती माझे सांगणे प्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष ही फिर्याद दिली सही

( किरण बिडवे )
पोलीस उपअधीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो जालना

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

sidharth jabaji mane(I (Inspector)) / **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

**(4) Transferred to P.S.**
**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**
**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

**15.Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

पोलीस ठाणे अमलदार

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** sidharth jabaji mane
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):**